Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# शिक्षक प्रशिक्षणामध्ये अभिनय आणि संवाद कौशल्य

**डॉ. सुजाता नानासाहेब तायडे**
प्राचार्य
स्व लालासाहेब शिक्षण महाविद्यालय तिवसा

मानव हा जन्मत: फक्त स्वतंत्र असुन नंतर सर्वत्र तो अनेक मर्यादामध्ये अडकला आहे. जीन जाक रुसो 1755 मधील डिस्कोर्स ऑन द ओरिजीन ऑफ इनइक्वीलिटी मध्ये रुसो म्हणतात विज्ञान आणि कला ने आपल्याला कपटी बनविले. खरे सुख सादगी मध्ये आहे ही गोष्ट जीन जॅक रुसोची, जे की लेखक कलाकार आणि तत्वज्ञ होते. १८ व्या शतकाला Age of Enlightment म्हटले गेले विज्ञान तर्क, कला, या विचाराचे नविन वादळ उठले होते. "Social Contract- सामाजिक अनुबंध" ने जीन रुसो मध्ये समाजातील तत्वज्ञान मांडले आणि कला या अंगाला महत्व दिले यांनी संगीत, लोकगीत याबाबत क्रांतीकारक बदल केले ते म्हणतात खरे संगीत निसर्गाकडून जन्माला येत असते त्यांनी Dictionary of Music बाबत विचार समजवून सांगीतले रुसो हा निसर्गवादी कलावंत, कलेचे जीवन जगण्याची राजनीतीची जाण असणारा एक तत्वज्ञ अलीकडे याची आठवण मला फार यायला लागली आहे. सुरुवातीला Education of Philosophy या पेपर मध्ये मी याचा जवळून अभ्यास केला आणि आताचा अभ्यासक्रम यामध्ये तत्वज्ञान विषय नसून त्यातील काही भाग समाविष्ट करण्यात आला आहे. आजच्या युगात प्रत्येक शाखेमध्ये क्षेत्रामध्ये आणि शिक्षण विषयामध्ये आवश्यकतेनुसार ( चित्र) बदल होतांना दिसते आहेत. विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा पाया म्हणजे शिक्षण, शिक्षण हे वाघीचे दुध आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात आणि गुरुगुरण्याची ताकद आपल्याला शिक्षण मिळून देते, अनेक सिध्दात, प्रणाली तत्वज्ञानाच्या तत्वाची ताकद विद्यार्थ्यांना बौध्दीक दृष्ट्या बलशाली होण्यास सहाय्यक करते. शिक्षण मिळविण्याचे एकमेव उत्तम साधन म्हणजे आपली आई गुरु, शिक्षक इत्यादी हा शिक्षक तयार होण्यामागे त्यांचा Internal Interest मैलाचा दगड सिध्द होत असतो.

Teacher is an Artist

Teacher is a dramatist

Teacher is a director

Teacher is a future maker of student

वरील विश्लेषणावरुन काही विष्लेषन हे बौध्दीक क्षमतेनुसर असून Teacher is an Artist या विषयासाठी त्यांची बौध्दीक विचारसोबत क्रियात्मक बाजू भक्कम असायला हवी. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान देणे नाही. वर्गात उभ्या राहिलेल्या शिक्षकाने विद्यार्थ्याचे लक्ष वेधून, घेणे विषय रंगत करणे, आणि संकल्पना मनापर्यत पोहोचवने ही खरी कला आहे यासाठी अभिनय आणि संवाद कौशल्य हे दोन पायाभुत घटक आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा बी.एड अभ्यासक्रमातही याची दखल घेवून Acting and communiction skill in teacher training हे प्रत्यक्षीक समाविष्ट करण्यात आले आहे. या मागचा उद्देश स्पष्ट आहे. शिक्षक म्हटलेकी त्याला अभिनय आणि बोलणे हवे आहे.

## संशोधनाची गरज :

प्रस्तुत विषयावर संशोधन करुन विद्यार्थ्यांच्या बौध्दीक क्षमता वाढविण्याची कळाची निकड आहे कारण Microsoft च्या २०२५ च्या अहवालानुसार आजच्या विद्यार्थ्यांचे सरासरी लक्ष फक्त ८ सेकंद आहे. सन २०१३ मध्ये १२ सेकंद होते फक्त व्याख्यानामध्ये ४५ मिनीटे लक्ष टिकविले अशक्य आहे त्यामुळे अभिनय व संवाद उपयोगी पडतात.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

शिक्षकांची क्षमता : ASIR २०२४ च्या अहवालानुसार ग्रामीण भागातील ५० टक्के पक्षा जास्त ५ वी च्या विद्यार्थ्यांना २ रीच्या वाचन येत नाही याचे एक कारण अध्यापन पध्दती कंटाळवाणी असणे, नाटय व संवाद आधारीत शिक्षणाने ६० टक्के आकलन ने वाढते असे NCERT चे संशोधन सागते

बी एड प्रशिक्षणार्थी - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील बी एड साठी दरवर्षी ३५०० विद्यार्थी प्रवेश घेतात. शिक्षक कसे बनावे ? कसे शिकवावे ? यांच्या अनेक पध्दतीमध्ये भुमिकाभिनय, नाट्यीकरण, प्रकल्प या महत्वाच्या पध्दतीचा उपयोग जेव्हा विद्यार्थी करतात तेव्हा शालेय विद्यार्थ्यांना आणि बी एड प्रशिक्षणार्थ्यांना सुध्दा अधिक परिणामकारक समजते त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या अधिक काळासाठी लक्षात राहण्यासाठी कलांच्या माध्यमातून अध्यापन करण्याची गरज भासते.

संगाबा च्या बीएड प्रात्यक्षीक कार्याचे महत्व.

संत गाडगेबाबा च्या २०२४-२५ च्या सुधारीत अभ्यासक्रमात Communication & expository skill चा समावेश आहे.

**सुक्ष्म कौशल्य / अभिवृध्दी कौशल्य :** शिक्षक प्रशिक्षणामधील महत्वाचा प्रथम अनुभवास येणारा टप्पा म्हणजे सूक्ष्म कौशल्य सादरीकरण यामध्ये ०५ ते ०७ मिनीटात विद्यार्थ्यांचे हावभाव, आवाज, हालचाल तपासले जातात.

**अभिरुप पाठ :-** याचा अर्थ सराव पाठ सुरु होण्याअगोदर विद्यार्थी ३५ ते ४५ मिनीटाचा वेळ कसा हाताळतो, सर्वच कौशयावर प्रभुत्व मिळवून आपले अध्यापन कसा प्रभावित करतो.? याचा सराव केला जातो. अभिनय पाठामध्ये अधिक सक्रिय राहुन सर्व सूक्ष्म कौशल्याला अधिक प्रभावशालीपणे व्यक्त करतो. नृत्य तंत्र नात्योकरण तंत्र किंवा भूमिकाभिनय पध्दतीच्या माध्यमातून विद्यार्थी पाठश्शाळा अधिकन्याय आणि सखोलता देण्याचा प्रयत्न करतो.

**नाट्यतंत्र** :- नाटयोकरण तंत्र किंवा भूमिकाकरण अभिनय पध्दतीच्या माध्यमातुन विद्यार्थी पाठयांश ला अधिक न्याय आणि सखोलता देण्याचा प्रयत्न करतो.

## नाटयकरणाचा फायदा / नाटक करण्याचा फायदा :

**अवधान केंद्रिकरण -** पाच मिनीटाच्या आत वर्गातील सर्व विद्यार्थी शिक्षकांच्या बोलण्याकडे अध्यापणामुळे लक्ष देतात. घरात वडिलधाऱ्यांना नाटक करुन पैसे घेणे व इतर देखावे दाखूवन जास्तीचे पैसे काढतात

**अध्ययन सोपे वाटते :** विद्यार्थ्यांना अवघड संकल्पना, नवीन मुद्दे, सोपे वाटायला लागतात एखादे उदाहरण नाटकीकरण पध्दतीने सादर करुन दाखविले जाते. त्यामुळे त्यांच्या भावी जीवनात त्याचा फायदा होतो.

**आत्मविश्वास वाढीस लागतो. :** यामुळे शिक्षक प्रशिक्षक विद्यार्थी यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढीस लागतो आपल्यातीलच एक क्षमता, गुण उत्तम प्रकारे प्रकट केल्यामुळे विद्यार्थ्यांचे अध्यापन करुन रुची वाढते.

**मूल्यनिर्धारण :** प्रामाणिकपणा, एकता सहकार्य या मूल्यांना नाट्टीकरणाकरुन सादर केल्या विद्यार्थी तसेच शिक्षक प्रशिक्षक यांच्या मध्ये मुल्ये वाढीस लागतात.

## संशोधन विषयाची उद्दीष्टे :

शिक्षक प्रशिक्षण मध्ये नाटयकरण कौशल्याची गरज अभ्यासणे

शिक्षकांना अभिनय आणि संप्रेषण कौशल्याचे वैशिष्टये तपासणे

भूमिका अभिनय पध्दतीचा अध्यापनावर परिणाम तपासणे

संगाबाच्या बी एड अभ्यासक्रमासाठी सुचना करणे

**न्यायदर्श :** प्रस्तुत संशोधनासाठी २८ विद्यार्थ्यांचा गट न्यायदर्श म्हणून घेण्यात आला

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत संशोधनामध्ये पध्दतीचा वापर करण्यात आला

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## निष्कर्ष :-

प्रस्तुत संशोधनातुन असे निकर्ष आलेले की हावभाव आणि देहबोली कौशल्य विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वाढीसाठी उपयुक्त ठरतात.

लाजाळु विद्यार्थी बोलायला घाबरत होते परंतु भुमिकाभिनय पध्दतीच्या माध्यमातुन त्यांची बोलण्यावर पकड मजबुत झाली

इतिहास , भाषा विषयासाठी भुमिकाभिनय पध्दतीने सर्वात जास्त परिणाम दर्श्विला

१२.५% विद्यार्थ्यांच्या मते वेळ कमी पडल्यामुळे नाट्टीकरण उपयोगात आणता येत नाही

**उप निष्कर्ष :**

कोणत्याही विषयातील मुलभुत संकल्पना शिकविण्यास हावभाव, आवेश, आवाज, यांची अतिशय महत्वाचे स्थान लक्षात येते. आईची माया, सैनिकाची शुरता, पहेलवानाची लढाई, शिवाजी महाराजांची शौर्यगाथा, वासरांची भटकंती, गरीबांची चिंता, शेतकऱ्यांचे संकट, या सारख्या विषयाला समजावुन सागने म्हणजे एक कलात्मक अनुभूती होय.

संगीता किंवा अभिनय कला , भाषण कला, यासारख्या गुणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास दृढ बनवून त्याला अनेक क्षेत्रातील मार्ग मिळण्यास सुरुवात होते.

## शिफारसी

बी एड अभ्यासक्रमातील प्रात्याशिक कार्यातील नाटय व कला या प्रात्याक्षिकासाठी त्याचा सैध्दातिक भाग समाविष्ट करावा.

कला विद्यार्थ्यांच्या सराव पाठातील दोन सराव पाठ नाट्टीकरण किंवा कला या पध्दतीच्या वापरावर आधारीत असावे

## संदर्भ ग्रंथ

NCERT (2023) Pedagogy of Drema and Art in Education

SGBAU 2024 B.Ed. Syllabus and Practial Manual

National Education Policy 20920 Ministry of Education Government of India.

ASER Report (2024) Pratham Education Foundation

Date E 1969 Audio and Visual methods in Teaching.

Teacher's Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985